
# नवभारत

## जानेवारी - 2021

2020



2021

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई संचालित मासिक

# नवभारत

वर्ष 74 । अंक 4 । जानेवारी 2021
मार्गशीर्ष/पौष शके 1942
वार्षिक वर्गणी रुपये 500/-
या अंकाची किंमत रुपये 50/-

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्राज्ञपाठशाळामंडळ सहमत असतीलच, असे नाही.

## नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

* नवभारत, ऑक्टोबर 1947, वर्ष 1 ले, अंक 1 मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

**प्राज्ञपाठशाळामंडळ**
**अध्यक्ष व विश्वस्त :**
सरोजा भाटे

**प्रमुख संपादक :**
राजा दीक्षित
भ्रमणध्वनी : 9767788954.

**कार्यकारी संपादक :**
अनिल जोशी
भ्रमणध्वनी : 9766995904.

**संपादक मंडळ :**
अशोक कृष्णाजी जोशी,
किशोर बेडकिहाळ,
राजेंद्र प्रभुणे,
शंतनू अभ्यंकर.

**संपादकीय पत्रव्यवहार :**
संपादक, नवभारत मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ,
वाई – 412 803 (जि. सातारा).
दूरध्वनी : (02167) 220006.
ई - मेल :- ppmwai@gmail.com

**व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**
सौ. नीता गायकवाड
व्यवस्थापक, नवभारत मासिक
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ, 315,
गंगापुरी, वाई – 412 803 (जि. सातारा)
दूरध्वनी : (02167) 220006.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाला अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच, असे नाही.

## 'नवभारत'च्या वार्षिक वर्गणीसंदर्भातील आवश्यक माहिती

वार्षिक वर्गणी - ५००/- रु. वर्गणी NEFT ने भरण्यासाठी बँकेचे तपशील –

Bank Name -- The Wai Urban Co-op Bank Ltd., Wai

591, Ganpati Ali, Wai, Tal - Wai, Dist. - Satara.

A/C Name -- Navbharat Masik

CBS A/C No -- 110103130001336

IFSC CODE -- SVCB0016101.

(SVCB नंतर O (ओ) नसून 0 (शून्य) आहे. काही तांत्रिक कारणांमुळे बँकेने सुमारे महिनाभर IMPS बंद ठेवले आहे; पण NEFT चालू आहे.)

वर्गणीचा चेक पाठवायचा असल्यास कृपया या नावाने पाठवावा –

**'नवभारत' मासिक**

वर्गणी चेक, डीडी किंवा मनिऑर्डरने पाठवायची झाल्यास कार्यालयीन पत्ता –

नवभारत मासिक, प्राज्ञपाठशाळामंडळ, ३१५, गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा).

NEFT ने वर्गणी पाठवल्याचेही स्वतःच्या नाव–पत्त्यासह याच पत्त्यावर पत्राद्वारे कळवता येईल. त्याऐवजी SMS वा Whats App द्वारे कळवायचे झाल्यास नवभारत कार्यालयातील सौ. नीता गायकवाड (मोबाईल 9423866556) यांना मेसेज करावा.

'व्यवस्थापक, नवभारत' यांचा संपर्कासाठीचा दूरध्वनी क्रमांक. - (02167) 220006.

## प्राज्ञपाठशाळामंडळास देणगी देण्यासाठी

वर दिलेल्या पद्धतीनेच देणगीची रक्कम जमा करावी. मात्र चेक, डीडी किंवा मनिऑर्डर पाठवायची झाल्यास ती या नावाने पाठवावी –

**प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई**

संपर्कासाठी पत्ता - सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ, ३१५, गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा).

Bank Name -- The Wai Urban Co-op Bank Ltd., Wai

591, Ganpati Ali, Wai, Tal - Wai, Dist. - Satara.

A/C Name -- Pradnyapathashala Mandal

CBS A/C No -- 110103130000084

IFSC CODE -- SVCB0016101.

(SVCB नंतर O (ओ) नसून 0 (शून्य) आहे. काही तांत्रिक कारणांमुळे बँकेने सुमारे महिनाभर IMPS बंद ठेवले आहे; पण NEFT चालू आहे.)

**वर्गणी आणि देणगीचे स्वागत आहे.**

# नवभारत

## जानेवारी 2021

## अनुक्रमणिका


☆ **संपादकीय** 5

☆ **स्मरण रेगे सरांचे...** 9

✎ शरद अभ्यंकर

☆ **पुरातत्त्वविद्येतील नवे प्रवाह** 12

✎ प्रमोद जोगळेकर

☆ **माधव आचवल यांची समीक्षा** 20

✎ सुधीर रसाळ

**पुस्तक परिचय**

☆ **भाग्यवान वेड्यांची दुनिया...** 35

✎ पृथ्वीराजसिंह ठाकूर

# भाग्यवान वेड्यांची दुनिया...

पृथ्वीराजसिंह ठाकूर

'पुस्तकांवरील पुस्तके' म्हणजे 'बुक्स अबाउट बुक्स' हा एक अत्यंत रमणीय साहित्यप्रकार आहे. वाचनाचे वेड असलेल्यांना तसेच पुस्तकांबद्दल व एकूणच ग्रंथव्यवहाराबद्दल आस्था असलेल्यांना अशी पुस्तके वाचण्यात एक अवर्णनीय आनंद मिळत असतो. इंग्रजीमध्ये अशी बुक्स अबाउट बुक्स अनेक आहेत. निकोलस बास्बेन्स, अल्बर्तो मॅन्गुएल हे तर या साहित्यप्रकारातील दिग्गज. निकोलस बास्बेन्सचे 'ए जेन्टल मॅडनेस', 'एव्हरी बुक इट्स रीडर', 'अमंग द जेन्टली मॅड' किंवा अल्बर्तो मॅन्गुएलचे 'अ हिस्टरी ऑफ रीडिंग', 'लायब्ररी ॲट नाईट' यांसारखी पुस्तके म्हणजे ग्रंथप्रेमींसाठी अनमोल ठेवा आहेत. काही वर्षांपूर्वी सुझान हिल या ब्रिटिश लेखिकेने वर्षभर नवी पुस्तके विकत न घेता स्वतःजवळचीच न वाचलेली निवडक पुस्तके वर्षभरात वाचून काढण्याचा संकल्प केला व तो पूर्ण झाल्यावर 'हॉवर्डस एंड इज ऑन द लॅन्डींग – अ इअर ऑफ रीडिंग फ्रॉम होम' हे सुंदर पुस्तक लिहिले.

पण मराठीमध्ये अगदी आता–आतापर्यंत अशा प्रकारच्या पुस्तकांची वानवा होती. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये मराठीतल्या काही चोखंदळ व व्यासंगी वाचकांनी आपल्या वाचनाबद्दल, वाचनानंदाबद्दल तसेच एकंदरीत ग्रंथव्यवहाराबद्दल पुस्तके लिहिण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये निरंजन घाटे यांचे 'वाचत सुटलो त्याची गोष्ट', सतीश काळसेकरांचे 'वाचणाऱ्याची रोजनिशी', नितीन रिंढे यांचे 'लीळा पुस्तकांच्या', निखिलेश चित्रे यांचे 'आडवाटेची पुस्तके' अशासारख्या पुस्तकांचा गौरवाने उल्लेख करावा लागेल. तत्पूर्वी गोविंदराव तळवलकर, अरुण टिकेकर यासारख्या व्यासंगी विद्वानांनी आपापल्या ग्रंथप्रेमाबद्दल व वाचनानंदाबद्दल लिहिले होते. गोविंदराव तळवलकर यांची 'वाचता-वाचता', 'सौरभ, भाग 1 व 2' तसेच अरुण टिकेकर यांचे 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' ही अत्यंत वाचनीय पुस्तके आजही आपली लोकप्रियता टिकवून आहेत. या पुस्तकांमध्ये आणखी एका दुर्मिळ पुस्तकाचा समावेश करावा लागेल. ते पुस्तक म्हणजे **भानू शिरधनकर** यांचे **'पुस्तकांची दुनिया'** हे होय. साहसकथा व शिकारकथा लिहिणारे जुन्या पिढीतील सुप्रसिद्ध लेखक व पट्टीचे वाचक असलेले भानू शिरधनकर आता विस्मृतीत गेले आहेत. परंतु शिरधनकर जरी मुख्यतः साहसकथा व शिकारकथा लिहिणारे लेखक असले तरी मुळात ते एक अत्यंत चोखंदळ व व्यासंगी वाचक व ग्रंथप्रेमी होते. त्यांनी 1967 साली **'पुस्तकांची दुनिया'** हे एक अप्रतिम असे पुस्तकांवरील पुस्तक लिहिले. आता हे पुस्तक दुर्मीळ व 'आऊट ऑफ प्रिंट' झाले आहे. पण सुदैवाने या पुस्तकाची एक पीडीएफ इंटरनेटवर मला मिळाली.

शिरधनकरांचे ग्रंथप्रेम इतके पराकोटीचे होते की, त्यांनी केवळ ग्रंथप्रेमापोटी हौस म्हणून ग्रंथालयशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण केला. 'पुस्तकांची दुनिया' या पुस्तकात त्यांनी एकूणच ग्रंथव्यवहार, ग्रंथांची घ्यावयाची काळजी तसेच स्वतःचे वाचन याबद्दल लिहिले आहे. परंतु विशेष म्हणजे अनेक सुप्रसिद्ध साहित्यिक, विद्वान व थोर महापुरुषांच्या वाचनप्रेमाबद्दल व व्यासंगाबद्दलसुद्धा त्यांनी अत्यंत दुर्मीळ, उपयुक्त आणि मनोरंजक अशी माहिती दिली आहे. त्यांच्या पुस्तकाचे मुख्यतः दोन भाग करता येतात. एका भागात त्यांनी सर्वसाधारण ग्रंथव्यवहार, ग्रंथालये, ग्रंथांची घ्यावयाची काळजी याबद्दल, तसेच स्वतःच्या वाचनवेडाबद्दल व आपण केलेल्या ग्रंथसंग्रहाबद्दल लिहिले आहे. दुसऱ्या भागात

त्यांनी अनेक प्रसिद्ध साहित्यिक व विद्वानांच्या ग्रंथप्रेमाबद्दल, वाचनाच्या सवयींबद्दल व वाचनशैलीबद्दल लिहिले आहे.

या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य म्हणजे पुण्यात एके काळी सुप्रसिद्ध असलेले जुन्या व दुर्मीळ ग्रंथांचे विक्रेते श्री. तात्या ढमढेरे यांची मुलाखत होय. एक स्वतंत्र प्रकरण म्हणून ही मुलाखत शिरधनकरांनी आपल्या पुस्तकात छापली आहे. 'वाळूतील सुवर्णकण' असे सार्थ शीर्षक या प्रकरणाला त्यांनी दिले आहे. 1951 पासून ढमढेरे यांनी जुन्या पुस्तकांचा व्यवसाय करायला सुरुवात केली. या व्यवसायात ते कसे पडले, अनेक दुर्मीळ व जुने ग्रंथ त्यांनी कसे मिळविले आणि कोणकोणत्या प्रसिद्ध व्यक्तींना त्यांनी ते पुरविले याची अत्यंत मनोरंजक व यापूर्वी कधीही प्रकाशात न आलेली माहिती या प्रकरणातून आपल्याला मिळते. 'आपल्याला वाचायला आवडेल, परंतु वाचायला वेळच मिळत नाही', अशी अनेकांची तक्रार असते. मात्र ही तक्रार कशी चुकीची आहे व रोजच्या रामरगाड्यातून थोडा थोडा वेळ जरी आपण काढला तरी एक माणूस आपल्या आयुष्यात किमान हजार-दीड हजार पुस्तके सहज कशी वाचू शकतो यावरही शिरधनकरांनी सप्रमाण लिहिले आहे.

अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींच्या ग्रंथप्रेमाचे मनोरंजक किस्से आपल्याला या पुस्तकात वाचायला मिळतात. यात काहींचे ग्रंथप्रेम तर इतके पराकोटीचे होते की, त्यासाठी त्यांनी चोरीसुद्धा केली आहे. आगाखान हे लहानपणापासूनच ग्रंथप्रेमी व पट्टीचे वाचक होते. त्यांची वाचनाची भूक एवढी जबर होती की, घरातली सर्व पुस्तके वाचून संपवल्यानंतर आता पुस्तके कुठून आणायची याचा त्यांना प्रश्न पडत असे. लहान असल्यामुळे घरून पुस्तकांसाठी पैसे मिळण्याचा संभव नव्हता. त्यामुळे आगाखान व त्यांचे बंधू हे मोठे झब्बे घालून एका पुस्तकाच्या दुकानात जात असत व हवी ती पुस्तके चोरून त्यात लपवून ते आणीत असत आणि आपली वाचनाची भूक भागवीत असत. एकदा ही चोरी पकडली गेली व त्याबद्दल आगाखान यांना त्यांच्या चुलत्याने केलेली शिक्षा सुद्धा भोगावी लागली. मात्र त्यानंतर त्यांना पुस्तके विकत घेण्यासाठी ठराविक रक्कम घरून मिळू लागली. हे व असे अनेक मनोरंजक किस्से या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतात. अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींचे, थोर साहित्यिकांचे वाचन कशा प्रकारचे होते, त्यांचा व्यासंग त्यांनी कसा वाढविला याबद्दल सुद्धा अतिशय प्रेरक व मनोरंजक माहिती शिरधनकर देतात. अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींच्या ग्रंथप्रेमाचे किस्से या पुस्तकात आले आहेत. त्यात न्यायमूर्ती रानडे, न्यायमूर्ती तेलंग, सर नारायणराव चंदावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. चिंतामणराव देशमुख, डॉ. वि. भि. कोलते, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, सर विन्स्टन चर्चिल, श्री. गोळवलकर गुरुजी, महाराज सयाजीराव गायकवाड, आचार्य धर्मानंद कोसंबी, संस्कृत पंडित डॉ. के. ना. वाटवे, श्री. म. माटे, विठ्ठलराव घाटे, वि. स. खांडेकर यांसारख्या महापुरुषांचा व थोर साहित्यिकांचा समावेश आहे. अशा महापुरुषांचा व्यासंग, त्यांचे वाचनप्रेम, त्यांचे ग्रंथप्रेम याबद्दल वाचून अवर्णनीय आनंद तर मिळतोच, परंतु आपल्यालाही प्रेरणा मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपण घरात असू तेथे हवे ते पुस्तक सहज हाती पडावे म्हणून एकेका पुस्तकाच्या पाच-पाच प्रती विकत घेत. भाऊसाहेब खांडेकर तर औषधे आणायला म्हणून निघत ते पुस्तके घेऊन परत येत. मग औषधांचीही गरज उरत नसे. आवडत्या पुस्तकाच्या सान्निध्यातच प्रकृती बरी होत असे. या सर्व थोर पुरुषांनी केवळ वाचायचे म्हणून वाचले नाही, तर आपल्या वाचनाचा व व्यासंगाचा आपल्या जीवनात सार्थ उपयोगही करून घेतला. यासंबंधी अनेक रंजक गोष्टी शिरधनकरांनी आपल्या पुस्तकात दिल्या आहेत. या पुस्तकाला सिद्धार्थ महाविद्यालयाचे तत्कालीन ग्रंथपाल व सुप्रसिद्ध व्यासंगी ग्रंथप्रेमी शा. शं. रेगे यांची प्रस्तावना लाभली आहे. आता हे पुस्तक दुर्मीळ झाले आहे. परंतु मराठीत पुस्तकांवरील पुस्तके या प्रकारात शिरधनकर

यांच्या या पुस्तकाचे नाव सन्मानपूर्वक घ्यावे लागेल, इतके हे पुस्तक उत्तम आहे. याची छापील आवृत्ती निघाल्यास सर्व ग्रंथप्रेमींसाठी ती एक पर्वणी ठरेल यात शंका नाही. हे पुस्तक इंटरनेटवर archive.org या वेबसाईटवर PDF स्वरूपात उपलब्ध आहे. ते सहज डाऊनलोड करून वाचता येईल.

मनोरंजनाच्या उथळ साधनांनाच ज्ञानाचे व आनंदाचे स्रोत समजण्याच्या आणि सांस्कृतिक कुपोषणाच्या या काळात हाती आवडते पुस्तक घेऊन भोंवतालच्या जगाला विसरून त्यात गढून जाण्यात काय अवीट आनंद असतो याची नवीन पिढीला (व त्यांच्या आईवडिलांनाही) जाणीव करून देणारी अशी पुस्तके आणखी खूप हवी आहेत.

पुस्तकाचे नाव - **पुस्तकांची दुनिया**
लेखकाचे नाव - भानू शिरधनकर
प्रकाशक - अभिनव प्रकाशन, 1967
पृष्ठे - 134.
https://archive.org/details/in.ernet.dli.2015.310180
भ्रमणध्वनी - 9881721193

❖❖❖

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

**वैदिक संस्कृतीचा विकास**

(तिसरी आवृत्ती, 1996)

**प्रा. मे. पुं. रेगे यांच्या विवेचक पुरस्कारासह**

वैदिक संस्कृतीचा विकास ह्या बृहद् ग्रंथात शास्त्रीजींनी अधिकाराने आणि कौशल्याने आपल्या प्रदीर्घ सांस्कृतिक वारशाचे आत्मीयतेने पण चिकित्सकपणे परीक्षण केले आहे. त्यांच्या संस्कृत वाङ्मयाच्या व्यासंगाच्या व्याप्तीची कल्पना या ग्रंथावरून चांगली येते. वैदिक वाङ्मय, दर्शने, महाकाव्ये, शास्त्रे, पुराणे, बौद्ध व जैन साहित्य इत्यादी सर्व शाखांतील संस्कृत साहित्याचा त्यांनी आपल्या विवेचनात पुरेपूर उपयोग केला आहे. वैदिक संस्कृतीची समावेशक, उदार, विधायक बाजू त्यांनी उलगडून दाखविली आहे.

**डेमी आकाराची** 36 + 572 **पृष्ठे**

**किंमत रु.** 600/-

**संपर्कासाठी पत्ता :**

**सचिव, प्राज्ञपाठशालामंडळ,**

315, **गंगापुरी, वाई** 412 803 **(जि. सातारा.)**

**फोन नं.** (02167) 220006 Email-ppmwai@gmail.com

✠ **डॉ. शंतनू शरद अभ्यंकर (सदस्य)**

एम. डी. स्त्री आरोग्य व प्रसूती शास्त्र यांचे तज्ज्ञ. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये निमंत्रित वक्ता म्हणून सहभाग. महाराष्ट्र शासनाच्या डॉ. आनंदीबाई जोशी पुरस्काराने सन्मान. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट आरोग्यविषयक ग्रंथास दिला जाणारा कै. विलास शंकर रानडे पुरस्कार. 'पाळी मिळी गुपचिळी' या पुस्तकास साहित्य पुरस्कार. लो. टिळक स्मारक संस्थेचे विद्यमान संचालक. प्राज्ञपाठशाळामंडळाचे विश्वस्त.

***पत्ता :–*** 'मयूर', 396, मधली आळी, वाई, जि. सातारा - 412803. भ्रमणध्वनी –9822010349.

**Email** - shantanusabhyankar@hotmail.com

## ❋ लेखक परिचय ❋

✠ **डॉ. शरद जर्नादन अभ्यंकर**

लेखक, वक्ते, सामाजिक कार्यकर्ते, प्राज्ञपाठशाळामंडळ संस्थेचे माजी संचालक व विश्वस्त. वाई रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष. ज. नी. अभ्यंकर ट्रस्टचे मुख्य विश्वस्त. लो. टिळक स्मारक संस्थेचे दहा वर्षे अध्यक्ष. वाई येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष. वाई येथील मॉडर्न क्लिनिकचे संस्थापक.

***पत्ता :–*** 'मयूर', 396, मधली आळी, वाई, जि. सातारा - 412803. भ्रमणध्वनी –9422400643.

**Email** - drsharadabhyankar@gmail.com

✠ **प्रा. डॉ. प्रमोद जोगळेकर**

पुण्याच्या 'डेक्कन कॉलेज'मध्ये पुरातत्त्व विभागात संशोधन व पदव्युत्तर अध्यापन (1987--2020). प्राचीन इतिहास, विज्ञान आणि तत्त्वज्ञान, विज्ञानाचा इतिहास, मानवी संस्कृतीची उत्क्रांती, समाज आणि विज्ञान हे अभ्यासाचे आवडीचे काही विषय. 'मॅन ॲण्ड एनव्हरॉनमेन्ट' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकाचे संपादक. प्रा. ह. धी. सांकलिया तरुण संशोधक पुरस्कार (1993), केम्ब्रिज विद्यापीठात चार्लस वॉलेस फेलोशिप (1998-99). विविध प्राच्यविद्या व इतिहास परिषदांचे अध्यक्षपद. भारतातील अनेक विद्यापीठांमध्ये अभ्यागत प्राध्यापक. अनेक ग्रंथ (लेखन व संपादन), अनुवादित ग्रंथ व कादंबऱ्या, शोधनिबंध प्रकाशित. 'जैवतंत्रज्ञान' (2001) या स्वतंत्र पुस्तकाला महाराष्ट्र राज्य वाङ्मय पुरस्कार आणि 'टाइमलाइन' (2004) या अनुवादित पुस्तकाला स्वामीकार रणजित देसाई पुरस्कार.

***पत्ता :–*** ३५५, जाधवनगर, वडगाव बुद्रुक, पुणे – 411041 भ्रमणध्वनी – 9763643996.

**Email** - pramjog@gmail.com

✠ **प्रा. डॉ. सुधीर रसाळ**

मराठीचे प्राध्यापक (निवृत्त), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. मराठीतील नामवंत समीक्षक. दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व केले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा गौरवमूर्ती पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेचा पहिला जीवनगौरव पुरस्कार, प्रा. रा. श्री. जोग पुरस्कार, अनंत भालेराव स्मृती पुरस्कार इ. अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. 'नवभारत'च्या संपादक मंडळाचे माजी सदस्य.

***पत्ता :–*** 100, श्रेयनगर, नवा उस्मानपुरा, औरंगाबाद – 421005 दूरध्वनी – 0240-2338134.

✠ **डॉ. पृथ्वीराजसिंह प्रतापसिंह ठाकूर**

गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव (जिल्हा बुलढाणा) येथे इंग्रजीचे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. 'भाषांतरातील समाज भाषाशास्त्रीय समस्यांचे अध्ययन' या विषयावर पीएच. डी. ही पदवी प्राप्त. भाषांतर, शेक्सपिअर व इंग्रजी भाषा शिक्षणामध्ये विशेष आवड.

https://ppthakur.wordpress.com या ब्लॉगवर नियमित लेखन.

***पत्ता :–*** चांदमारी, चर्चसमोर, खामगाव, जि. बुलढाणा – 444303 भ्रमणध्वनी – 9881721193.

**Email** - prithvithakur1@rediffmail.com